

Right Place For Bright Future

Manoharbhai Shikshan Prasarak Mandal, Armori's



# Mahatma Gandhi Arts, Science and Late N. P. Commerce College, Armori

Dist. Gadchiroli (M.S.) – 441 208

Established - 1981

Reaccredited by NAAC Banglore with ‘A’ Grade (2017)

गडचिरोली जिल्ह्यात सर्वोच्च मानांकन








# Prospectus

2022-23




म. शि. प्र. मं. आरमोरीच्या वतीने आयोजित गुणवत्ता गौरव पुरस्कार सोहळ्यात गुणवंत विद्यार्थ्यांना पुरस्कृत करताना संस्थेचे सचिव मा. मनोजभाऊ वनमाळी व उपस्थित मान्यवर.

पदवीदान समारंभाप्रसंगी उपस्थित महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, प्राध्यापकवृंद व पदवीप्राप्त विद्यार्थी.





व्यक्तिमत्त्व विकास शिबीर आणि आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेला उद्घाटक म्हणून मार्गदर्शन करताना गोंडवाना विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. श्रीराम कावळे.

माजी विद्यार्थी मेळाव्याप्रसंगी आपले महाविद्यालयीन जीवन व यशस्वी वाटचाल व्यक्त करताना महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी गडचिरोली येथील सी-६० कमांडो प्रशिक्षक श्री. भोजराज शेबे व उपस्थित माजी विद्यार्थी.







गोंडवाना विद्यापीठाचा विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट वार्षिकांक पुरस्कार उच्च व तंत्र शिक्षणमंत्री ना. उदयजी सामंत आणि मान्यवरांच्या हस्ते स्वीकारताना प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा, संपादक मंडळाचे डॉ. नोमेश मेश्राम, डॉ. विजय रैवतकर व प्रा. शशिकांत गेडाम.

पालक- शिक्षक - विद्यार्थी मेळावा आणि शिवजयंती समारंभाप्रसंगी अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा.



# आमचे प्रेरणास्थान



दलितमित्र

## स्वर्गीय वामनरावजी वनमाळी

संस्थापक अध्यक्ष

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी, जि. गडचिरोली

# आमचे प्रेरणास्थान



**स्वर्गीय मुरलीधरराव वामनरावजी वनमाळी**

अध्यक्ष

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी, जि. गडचिरोली



**स्वर्गीय अब्दुलभाईजी पंजवानी**

संस्थापक कार्याध्यक्ष

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी, जि. गडचिरोली

# मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी

## ✻ कार्यकारी मंडळ ✻



✻ अध्यक्ष ✻

श्रीमती सुनितातार्ई मुरलीधरराव वनमाळी



उपाध्यक्ष

श्री. नुरअल्लीभाई अब्दुलभाई पंजवानी



सचिव

श्री. रिद्धेश्वर वामनरावजी वनमाळी



कोषाध्यक्ष

श्री. हरिश्चंद्र महादेवराव बोंदरे



सहसचिव

श्री. दिपकराव बळीरामजी बेहरे



सदस्य

श्री. नामदेवराव काशिनाथजी सोरते



सदस्य

श्री. मयुर मुरलीधरराव वनमाळी



सदस्य

श्री. उमाकांत हरिभाऊ वनमाळी



सदस्य

श्री धनंजय वामनरावजी वनमाळी



सदस्य

श्री. दिपक वामनरावजी वनमाळी



सदस्य

श्री. प्रकाश मोहन भोयर

# आमचे मार्गदर्शक



## श्री. रिद्धेश्वर वामनरावजी वनमाळी

✻ सचिव ✻

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी, जि. गडचिरोली

# आमचे मार्गदर्शक



## प्राचार्य डॉ. लालसिंग खालसा

**महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय,**

**आरमोरी, जि. गडचिरोली**

# महाविद्यालयातील प्रशस्त प्रयोगशाळा आणि ग्रंथालय









## Our Vision

To educate, encourage and empower the girls and boys of this rural & tribal area.

## Our Mission

To include the excluded
To educate for self-reliance
To promote national integration
To make commitment to community
To create environmental awareness

### संपादक मंडळ

प्रा. डॉ. नोमेश मेश्राम
प्रा. डॉ. विजय रैवतकर
प्रा. डॉ. किशोर वासुर्के
प्रा. अनिल राऊत

### प्रकाशक

**डॉ. लालसिंग खालसा**
प्राचार्य
महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य
महाविद्यालय, आरमोरी जि. गडचिरोली

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी, जि. गडचिरोली द्वारा संचालित

# महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न. पं. वाणिज्य महाविद्यालय

आरमोरी, जि. गडचिरोली – ४४१ २०८

## महाविद्यालय विकास समिती

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | श्रीमती सुनितातार्इ मुरलीधरराव वनमाळी | ..... | अध्यक्ष |
| (२) | श्री. रिद्धेश्वर वा. वनमाळी | ..... | म.शि.प्र.मं. सचिव |
| (३) | श्री. नुरअल्लीभाई पंजवानी | ..... | सदस्य |
| (४) | श्री. दिपक बळीरामजी बेहरे | ..... | सदस्य |
| (५) | श्री. नादिरभाई सुलेमानभाई पंजवानी | ..... | सदस्य |
| (६) | श्री. मयुर मुरलीधरराव वनमाळी | ..... | सदस्य |
| (७) | प्राचार्य डॉ. लालसिंग एच. खालसा | ..... | पदसिद्ध सचिव |
| (८) | प्रा. डॉ. छगन मुंगमोडे | ..... | शिक्षक प्रतिनिधी |
| (९) | प्रा. डॉ. मनोज ठवरे | ..... | शिक्षक प्रतिनिधी |
| (१०) | प्रा. स्नेहा मोहुर्ले | ..... | शिक्षक प्रतिनिधी |
| (११) | प्रा. डॉ. नोमेश मेश्राम | ..... | समन्वयक IQAC |
| (१२) | प्रा. डॉ. विजय रैवतकर | ..... | सदस्य |
| (१३) | श्री. मोरेश्वर तागडे | ..... | शिक्षकेत्तर कर्मचारी प्रतिनिधी |



## मनोगत

**श्री. रिद्धेश्वर वामनरावजी वनमाळी**
**सचिव**
मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी

गडचिरोली जिल्ह्यांतर्गत आदिवासी, दलित, ग्रामीण गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण मिळावे, ते स्वावलंबी व्हावेत यासाठी मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ आरमोरी समाजसेवेचे व्रत स्वीकारून गेल्या ६० हून अधिक वर्षापासून निष्ठेने शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. या शिक्षण प्रसारक मंडळांतर्गत आमचे महात्मा गांधी कला, विज्ञान व स्व. न.पं. वाणिज्य महाविद्यालय, आरमोरी हे गडचिरोली जिल्ह्यातील एक नामांकित महाविद्यालय असून मागील चार दशकांपासून संस्थापक अध्यक्ष स्व. वामनरावजी वनमाळी यांच्या शैक्षणिक–सामाजिक मूल्यनिष्ठेवर अधिष्ठित त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सत्य, अहिंसा, प्रेम, बंधुता, समता आणि न्याय या तत्त्वांतून ज्ञानदानाचे कार्य निष्ठेने करीत आहे.

या शिक्षणरूपी रोपट्याचा वटवृक्ष झाल्याचे पाहताना आम्हाला फारच आनंद होत आहे. सेवाव्रती स्व. वामनरावजी वनमाळी यांनी मोठ्या प्रतिकुल परिस्थितीत याचे बीजारोपण करून जोपासना केली आणि अज्ञानरूपी अंधाराचे ज्ञानरूपी प्रकाशात परिवर्तन केले. ही ज्ञानप्रसारक संस्था म्हणजेच मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ व नव्या रूपातील ‘स्व. वामनरावजी वनमाळी नॉलेज सिटी’ होय.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या संस्कारशाळेत आमच्या वडिलांची जडणघडण झाली आणि ‘‘उच्च ज्ञानाची विद्यालये । गावीच आणावी निश्चये । जी ग्रामजीवन सजवतील चातुर्ये । शिकवोणी जना ।।’’ या शिकवणुकीने अविकसित अशा परिसरात शिक्षणाचा प्रसार करून विकास करावा म्हणून १९५४ साली ही संस्था स्थापन झाली. मनोहरभाई पटेल यांच्यासारख्या दानशुर पुण्यवंताने सहकार्य करून या संस्थेला सामर्थ्य दिले. या संस्थेचा सुवर्णमहोत्सव झाला. अधिक प्रगल्भ, परिपक्व आणि विविध विद्याशाखांनी ही संस्था बहरली. सहा तपाहून अधिक काळ मागास, गोरगरीब, अज्ञानी आणि आदिवासी बांधवांची सेवा ही संस्था करीत आहे. अनेक नामवंत न्यायाधीश, वकील, प्राध्यापक, शिक्षक, विविध प्रशासकीय अधिकारी, पोलीस अधिकारी यांचे सृजन या संस्थेतूनच झाले.

संतांचे संस्कार घेऊन ‘बोले तैसा चाले’ ही वडिलांची नीती आम्ही अंगिकारली. प्रामाणिकपणा, भेदहीनता, निरहंकारीपणा, मानवता या मूल्यांना जोपासून निरंतर शिक्षणप्रसार सुरू ठेवल्यामुळे विविध जात, धर्म, पंथांची अनेक मुले दूरदूरून येथे शिक्षणासाठी येतात आणि ज्ञानशिदोरी घेऊन जातात.

काळ बदलला, शिक्षणाचे स्वरूप, ध्येय बदलले, विज्ञानाला महत्त्व आले. आता आरमोरीबाहेर शिक्षणविस्तार करावा म्हणून चंद्रपूर जिल्ह्यात नागभीडला आणखी एका विद्याशाखेचे बीजारोपण केले. तेथेही अनुदानित विज्ञानशाखा आठ वर्षांपासून निरंतर सुरू आहे. माध्यमिक विद्यालय, कन्या विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय नंतर वरीष्ठ महाविद्यालय व पुढे पीएच.डी. संशोधन केंद्र अशा क्रमाक्रमाने विस्तार होऊन हा वृक्ष बहरला. आज कम्युॅनिटी कॉलेजपासून विविध प्रकारचे रोजगाराभिमुख शिक्षण देऊन 'शिक्षण जीवनविकासाचा पाया असतो,' हे विद्यार्थ्यांना या संस्थेच्या माध्यमातून समजावून सांगितले जाते. जीवनातील विविध स्पर्धांना निर्भयपणे सामोरे जाण्याचे तंत्र याच संस्थेतून दिले जाते आणि मूल्याधारित शिक्षण देऊन विद्यार्थ्यांचा पाया मजबूत केला जातो. महाविद्यालय परिसरातील राष्ट्रपिता महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि स्व. वामनरावजी वनमाळी यांच्या पुतळ्यांना, विचारांना आणि कार्यांना साक्षी ठेवून हे सगळे कार्य होत आहे.

आज आपले महाविद्यालय गडचिरोली जिल्ह्यात सर्वोच्च मानांकित आहे. ही उल्लेखनीय व अभिमानाची बाब आहे. स्व. वामनरावजी वनमाळी आणि स्व. किशोरभाऊ वनमाळी यांच्या स्वप्नपूर्तीचा हा लौकिक आहे. जिद्द, चिकाटी, त्याग, परिश्रम या सद्गुणांचे संस्कार संस्थेतील प्रत्येक पदाधिकारी व महाविद्यालयीन कर्मचारी यांच्यात आहेत. संस्थेचे सर्व पदाधिकारी व महाविद्यालयीन प्रत्येक कर्मचारी संस्थेप्रती प्रामाणिकवृत्तीने कार्य करीत आहेत. त्यांच्या समर्पणवृत्तीचे फलित म्हणजे २०१७ च्या नॅक पुनर्मूल्यांकनात संस्थेला 'अ' दर्जा प्राप्त झाला व २०१८–१९ मध्ये महाविद्यालयाला गोंडवाना विद्यापीठातर्फे देण्यात येणारा ''उत्कृष्ट महाविद्यालय'' पुरस्कार प्राप्त झाला.

संस्थेचे अध्यक्ष स्व. किशोरभाऊ वनमाळी, कार्याध्यक्ष स्व. अब्दुलभाईजी पंजवानी यांनी दिलेले योगदान आमच्या कायम स्मरणात राहील. संस्थेचे सर्व पदाधिकारी व कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी केलेल्या अथक परिश्रमातून आज महाविद्यालयाला मिळालेला 'अ' दर्जा संस्थापक अध्यक्ष स्व. वामनरावजी वनमाळी, संस्थेचे अध्यक्ष स्व. किशोरभाऊ वनमाळी व संस्थेचे कार्याध्यक्ष स्व. अब्दूलभाईजी पंजवानी यांची स्वप्नपूर्ती होय.



# आवाहन...!

**डॉ. लालसिंग खालसा**
**प्राचार्य**
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी

प्रिय विद्यार्थी मित्रांनो,

मला सांगताना आनंद होतो की, आदरणीय स्व.श्री. वामनरावजी वनमाळी यांनी आपल्या एकनिष्ठ व त्यागी सहकाऱ्यांसोबत १९८१ ला लावलेल्या या रोपट्याचे डेरेदार वटवृक्षात रूपांतर होऊन गडचिरोली जिल्ह्यासारख्या दूर्गम भागात आज शिक्षणाची गंगा वाहू लागलेली आहे. ध्येयपूर्तीकडे वाटचाल करणाऱ्या या महाविद्यालयात आपल्या आगमनाचे हार्दिक स्वागत.

ज्ञानक्षेत्राची उत्तुंग शिखरे गाठत महाविद्यालयाने आज गोंडवाना विद्यापीठात नावलौकिक मिळविला. संस्थेचे पदाधिकारी, व्यवस्थापन मंडळातील सदस्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी या सगळ्यांच्या सहभागामुळे महाविद्यालयाला आज उत्कृष्ट शैक्षणिक दर्जा प्राप्त झाला. नॅक पुनर्मूल्यांकन समिती बेंगलुरूने महाविद्यालयाला २०१७ मध्ये 'अ' हा दर्जा दिला. हा दर्जा गडचिरोली जिल्ह्यात सर्वोच्च आहे, ही संस्थेसाठी तसेच महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब आहे.

महाविद्यालयाला हे यश एकाएकीच प्राप्त झालेले नाही. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची मेहनत, त्यांची सहकार्यशीलता, महाविद्यालय विकास समितीकडून सातत्याने होणारे प्रयत्न तसेच महाविद्यालयातील समर्पित व सुविद्य प्राध्यापकांच्या अथक परिश्रमाचे हे फळ आहे. त्यांच्या प्रयत्नामुळे विद्यापीठीय परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या तुलनेत नेहमीच पुढे असते आणि महाविद्यालयातून निघणारे विद्यार्थीसुद्धा जीवनाच्या प्रगतीत यशस्वीपणे वाटचाल करीत आहेत.

इंटरनेट, संगणक यांची विपुलता महाविद्यालयात प्रभावी शैक्षणिक वातावरण तयार करीत असते. विविध विद्याशाखांकडून दिले जाणारे व्यवसायाभिमुख व रोजगाराभिमुख अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता विकसित करण्याची प्रेरणा देतात. संभाषण कौशल्य आणि विद्यार्थ्यांत समाजशीलता निर्माण करणारी वर्तणूक ही वैशिष्ट्ये आजच्या स्पर्धात्मक युगात यशस्वी होण्यासाठी आवश्यक आहेत. 'स्पोकन इंग्लिशसारखे' अभ्यासक्रम राबवून आम्ही ही पूर्तता करीत असतो. महाविद्यालयात विविध मार्गदर्शन केंद्राचे उपक्रम सातत्याने राबविले जातात. यामध्ये प्राप्त मार्गदर्शनातून विद्यार्थी मोठ्या संख्येने स्पर्धा परीक्षेकडे वळून यशस्वी होऊ लागले, ही अभिमानाची बाब आहे.

आज महाविद्यालयात पदवीस्तरावर जवळजवळ सर्वच विषयांत पारंपरिक आणि व्यावसायिक शिक्षण घेऊन पदवी प्राप्त करण्याची उत्तम सोय आहे. शिवाय कला आणि विज्ञान शाखेत पदव्युत्तर शिक्षण घेण्याची संधी महाविद्यालयात आहे. महाविद्यालयात गणित, प्राणिशास्त्र, मराठी, इतिहास, समाजशास्त्र या विषयांमध्ये पीएच.डी. करण्याची उत्तम संधी विद्यार्थ्यांना आहे.

कलागुणानुरूप रोजगार मिळावा म्हणून विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) पुरस्कृत महाविद्यालयात कम्युनिटी कॉलेज (डिप्लोमा ॲण्ड ॲडव्हांस डिप्लोमा इन फॅशन ॲण्ड ड्रेस डिझायनिंग) अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला आहे. शिवाय महाविद्यालयात हर्बल मेडिसिन, कुकरी,

मेंटेनन्स ऑफ होम अप्लायंसेस, ऑफिस ऑटोमेशन, कम्युॅनिकेटिव इंग्लिश, ट्रायबल टुरिझम, सेरीकल्चर असे विविध करियर ओरिएंटेड अभ्यासक्रम सातत्याने सुरू असून विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण दिले जाते. महाविद्यालयातील विविध विभागांनी अनेक औद्योगिक कंपन्यांशी संलग्नीकरण (इंडस्ट्रीयल टायअप) केले असून विद्यार्थ्यांना योग्य ते प्रशिक्षण दिले जाते व रोजगाराच्या दृष्टीने प्रयत्न केले जातात. महाविद्यालयात कॅम्पस सिलेक्शन अंतर्गत विविध विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट केले जाते. तसेच महाविद्यालयात ह्युॅमन राईट्स एज्युकेशन सर्टिफिकेट व डिप्लोमा कोर्स सुरू करण्यात आलेले आहे. २०१८-१९ यावर्षी हिंदुस्थान पेट्रोलियम तर्फे गुणवंत्ताप्राप्त ८८ व २०१९-२० या सत्रात ३१८ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५ ते ६ हजार रुपये शिष्यवृत्ती देण्यात आली.

महाविद्यालयाने शासनाद्वारे चालविलेल्या विविध सामाजिक-सांस्कृतिक उपक्रमांत सदैव सहभाग नोंदविला. महाविद्यालयाला शासनस्तरावर नेहमीच गौरविण्यात आले. महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने महाविद्यालयाने बजावलेली भूमिका निश्चितच स्तुत्य आहे. महाविद्यालयाने २०१२-१३ आणि २०१३-१४ मध्ये 'जागर जाणिवांचा, तुमच्या आमच्या लेकीचा !' हा उपक्रम सातत्याने दोन वर्षे राबविला. याची पावती म्हणून महाविद्यालयाला २०१२-१३ ला विद्यापीठस्तरीय द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले होते. तसेच २०१३-१४ ला जिल्ह्यात प्रथम आणि गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली द्वारे द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ही संस्थेसाठी निश्चितच कौतुकाची बाब आहे. महाविद्यालयाने रस्ता सुरक्षा अभियान सातत्याने राबविला असून या अभियानाच्या उल्लेखनीय कामगिरीकरिता २०१२-१३ व २०१३-१४ या दोन वर्षांत विद्यापीठाचा प्रथम पुरस्कार मिळाला आणि राज्यस्तरावर उत्तेजनार्थ पुरस्काराने महाविद्यालयाला गौरवान्वित करण्यात आले. २०१८-१९ ला गोंडवाना विद्यापीठाचा 'उत्कृष्ट महाविद्यालय' पुरस्कार प्राप्त झाला तसेच उच्च शिक्षणात भरीव कामगिरी करण्यासाठी व महाविद्यालयात आधारभूत सुविधांच्या विकासासाठी रुसाकडून (राष्ट्रीय उच्च शिक्षा अभियान) महाविद्यालयाची निवड झाली. महाविद्यालयीन प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांना राज्य व विद्यापीठस्तरावरील अनेक पुरस्कार सातत्याने प्राप्त होत असतात. महाविद्यालयाच्या 'शब्दशिल्प' या वार्षिकांकाला प्रत्येक वर्षी उत्कृष्ट वार्षिकांक पुरस्कार देऊन गोंडवाना विद्यापीठ गडचिरोलीने गौरवान्वित केले. महाविद्यालयाचे रासेयो पथक, कार्यक्रम अधिकारी, रासेयो स्वयंसेवक, करिअर कट्टा अशा उपक्रमांना विद्यापीठस्तरीय व राज्यस्तरीय पुरस्कार मिळाले.

महाविद्यालय विद्यार्थीकेंद्रित व समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबवित असते. मागील सत्र हे कोविड-१९ च्या प्रादुर्भावाचे असतानासुद्धा या काळात महाविद्यालयातील विविध विभागांनी अयोजित केलेले ऑनलाईन चर्चासत्र, कार्यशाळा, परिसंवाद, अभ्यासपुरक उपक्रम ज्ञानप्रवाहास गती देणारे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणारे आणि प्रेरणादायी आहेत.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अन्वये २१ व्या शतकात शाश्वत विकास ध्येय प्राप्त करणे शक्य होईल अशी समर्थ, सशक्त शैक्षणिक व्यवस्था उभारणे हे या धोरणाचे उदिष्ट आहे. भारतीय मूल्य जोपासून अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये मूलभूत कर्तव्य संवैधानिक मूल्य तसेच देशाशी युवा पिढीचे बंध निर्माण करणे या नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या उदिष्टांशी संस्था सदोदित कटिबद्ध आहे.

# महाविद्यालयाची पार्श्वभूमी

गडचिरोली जिल्ह्यांतर्गत आदिवासी, दलित, ग्रामीण गोरगरीब मुलामुलींना शिक्षण मिळावे, ते स्वावलंबी व्हावेत यासाठी सन १९५४ ला आरमोरी येथे मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना करण्यात आली. ही संस्था समाजसेवेचे व्रत स्वीकारून गेली ६७ वर्षे शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणे व जबाबदारीने निष्ठापूर्वक कार्य करीत आहे. या शिक्षण प्रसारक मंडळाची यशस्वी वाटचाल निश्चितच प्रेरणादायी आहे.

आरमोरी परिसरातील एक शिक्षणप्रेमी व धडाडीचे कार्यकर्ते स्व. वामनरावजी वनमाळी यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने १९५४ साली महात्मा गांधी विद्यालय सुरू केले. या विद्यालयाच्या उद्‌घाटनप्रसंगी गोंदियाचे तत्कालीन उद्योगपती श्री. मनोहरभाई पटेल उपस्थित होते. त्यांनी ११ हजार रुपयांची देणगी जाहीर केली. त्यामुळेच त्यांच्या स्मरणार्थ शिक्षणसंस्थेचे नाव मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळ, आरमोरी असे ठेवण्यात आले. या संस्थेंतर्गत सर्वप्रथम आरमोरीत महात्मा गांधी विद्यालय सुरू करण्यात आले नंतर १९७६ ला महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली व त्यात कला, वाणिज्य आणि विज्ञान या तीनही शाखेतून शिक्षणाची सोय विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केली गेली. ही संस्था उत्तरोत्तर शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने कार्य करू लागली. १९८१ मध्ये महात्मा गांधी कला व वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना करून महाविद्यालयीन शिक्षणाची सोय करण्यात आली.

मुलींच्या शिक्षणाला गतिशीलता मिळविण्यासाठी १९८४ मध्ये महात्मा गांधी कन्या विद्यालयाची स्थापना करण्यात आली.

महात्मा गांधी महाविद्यालयाची शैक्षणिक प्रगती उत्तरोत्तर सुरू असताना १९८६-८७ मध्ये महाविद्यालयात विज्ञान शाखेची सुरुवात झाली. विज्ञान शाखेतील शिक्षणविषयक सोय या संस्थेने गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी परिसरात पहिल्याप्रथमच करून दिली.

या शिक्षण प्रसारक मंडळांतर्गत १९८७ मध्ये इंदिरा गांधी मुलींचे वसतिगृह व स्व.कासमभाई लालानी मुलांचे वसतिगृह, २००८ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे प्राप्त अनुदानातून सर्व सोयींनी युक्त स्व. वत्सलाबाई वामनराव वनमाळी मुलींचे वसतिगृह निर्माण करण्यात आले.

संस्थेने आरमोरी परिसराव्यतिरिक्त चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी कला व विज्ञान महाविद्यालयाची स्थापना करून परिसरातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची सोय केली.

मनोहरभाई शिक्षण प्रसारक मंडळांतर्गत विविध विद्याशाखांद्वारे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शिक्षण दिले जाते.

विविध विद्याशाखा कसोशीने उत्तरोत्तर प्रगतिशील, आधुनिक दृष्टीतून शैक्षणिक कार्य करीत आहेत.

शिक्षणसंस्था संचालित महात्मा गांधी कला, विज्ञान आणि स्व.न.पं.वाणिज्य महाविद्यालयाचे गोंडवाना विद्यापीठात सन्मानपूर्वक नाव घेतले जाते. हे महाविद्यालय नॅक मूल्यांकनानुसार गडचिरोली जिल्ह्यातील अव्वल मानांकित महाविद्यालय आहे, ही अभिमानाची बाब आहे. २००३–०४ या सत्रापासून महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यता प्राप्त झाली व महाविद्यालयाला 2(F) व 12(B) चा दर्जा मिळाला. २०११–१२ या सत्रात नॅक पुनर्मूल्यांकन समिती बेंगलुरूद्वारे 'B' ग्रेड 2.88 CGPA हा दर्जा प्राप्त झाला होता. दि. २०, २१, २२ फेब्रुवारी २०१७ ला नॅक बेंगलुरूच्या पिअर टीमने भेट दिली व महाविद्यालयाचे पुनर्मूल्यांकन करून महाविद्यालयाला 'अ' दर्जा बहाल केला. ही महाविद्यालयाच्या उत्तरोत्तर विकासाची पावतीच होय.

महाविद्यालयात पदवीस्तरावर तीनही शाखेत जवळजवळ सगळेच विषय उपलब्ध आहेत. संस्थेच्या व्यवस्थापन समितीने व महाविद्यालयातील प्रशासनाने नेहमीच शिक्षणातील आधुनिक दृष्टिकोनाचा स्वीकार केला. त्यानुसार २००७–०८ मध्ये महाविद्यालयात पदवीस्तरावर Microbiology, Music, Home Science असे उपयोगी विषय सुरू करण्यात आले.

सत्र २००५–०६ मध्ये पदव्युत्तर कला शाखेत इतिहास व अर्थशास्त्र आणि पदव्युत्तर विज्ञान शाखेत गणित विषय सुरू करण्यात आले. सत्र २०१२–१३ मध्ये पदव्युत्तर कला शाखेत मराठी आणि पदव्युत्तर विज्ञान शाखेत रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र तर २०१३–१४ मध्ये पदव्युत्तर कला शाखेत समाजशास्त्र आणि पदव्युत्तर विज्ञान शाखेत प्राणिशास्त्र विषय सुरू करण्यात आले. शिवाय महाविद्यालयात गणित, प्रणिशास्त्र, मराठी, इतिहास, समाजशास्त्र या विषयांत आचार्य पदवीकरिता संशोधन केंद्राची मान्यता असून महाविद्यालयात संशोधन कार्य करण्याची उत्तम सोय आहे. महाविद्यालय पदवी, पदव्युत्तर व संशोधनक्षेत्रातील शिक्षणाविषयी नेहमीच जागरुक राहिले आहे.

संस्था सामाजिक बांधीलकीतून कार्य करीत आली आहे. महापुरुषांच्या विचारांवर नेहमी अंमल करीत आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना महापुरुषांचे विचार व कार्य यांची माहिती व्हावी या हेतूने डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्ययन व संशोधन केंद्र आणि महात्मा गांधी अभ्यास व संशोधन केंद्र या अभ्यासकेंद्राची स्थापना करण्यात आली. त्याद्वारे या दोन्ही महापुरुषांचे विचार विद्यार्थ्यांमध्ये रुजविले जातात. महाविद्यालयात यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र सुरू करण्यात आले. त्यानुसार पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण दिले जाते. महाविद्यालयात विविध रोजगाराभिमुख शिक्षण देऊन विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविले जाते.

## Our Students Awarded with Medals at University Level

| Sr. No. | Name of Students | Examination | Year | University Rank | Type of Medals | Name of Medals/Sponsor |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | Ku. Bakul Nitin Shende | B.Sc. Geology | March 2009 | 1st | Gold | R.B.Jatashankar P. Trivedi Memorial Gold Medal Award. |
| | | | | | Silver | Krishna and Pamela Sappal Geology Golden Jubilee Silver Medal Award |
| 2. | Mr. Nepal Dadaji Madavi | B.A. | March 2009 | 1st | Gold | Late Bapuji Patil Mamulkar Award |
| 3. | Ku. Apurva Anil Lohe | B.Sc.I | March 2012 | | Inspire Scholarship | National Institute of Science and Technology New Delhi |
| 4. | Ku. Kirti V. Borkar | M.Sc. (Geology) | March 2014 | 1st | Gold | Gondwana University, Gadchiroli |
| 5. | Ku. Akshu B. Bharre | M.Sc. (Geology) | 2015 | 1st | Gold | Late Dantulwar Gold Medal Award Gondwana University, Gadchiroli |
| 6. | Ku. Leena Zode | M.Sc. (Geology) | 2015 | 2nd | Gold | Gondwana University, Gadchiroli |
| 7. | Ku. Priyanka Tijare | M.Sc. (Geology) | 2015 | 3rd | Gold | Gondwana University, Gadchiroli |
| 8. | Ku. Nisha Kapkar | M.A. (Marathi) | 2015 | 3rd | Gold | Gondwana University, Gadchiroli |
| 9. | Mr. Shubham R. Inkane | B.A. | 2015 | 10th | Gold | Gondwana University, Gadchiroli |
| 10. | Ku. Jyoti H. Zure | M.Sc. (Geology) | 2016 | 1st | Gold | Gondwana University, Gadchiroli |
| 11. | Ku. Kiran D.Nimje | M.Sc. (Geology) | 2016 | 2nd | Gold | Gondwana University, Gadchiroli |

## Our Students Awarded with Medals at University Level

| Sr. No. | Name of Students | Examination | Year | University Rank | Type of Medals | Name of Medals/Sponsor |
|---|---|---|---|---|---|---|
| 12. | Ku. Namrata N.Kalbandhe | M.Sc. (Geology) | 2016 | 3rd | Gold | Gondwana University, Gadchiroli |
| 13. | Mr. Amol R. Ladve | M.A. (History) | 2017 | 1st | Gold | Gondwana University, Gadchiroli |
| 14. | Mr. Nilesh K. Donadkar | M.A. (Econo.) | 2017 | 1st | Gold | Gondwana University, Gadchiroli |
| 15. | Ku. Prasannata D.Meshram | M.Sc. (Geology) | 2017 | 1st | Gold | Gondwana University, Gadchiroli |
| 16. | Rahul Siddharth Ramteke | B.Sc. (Botany) | 2018 | 1st | Gold | Gondwana University, Gadchiroli |
| 17. | Rohit Dadaji Meshram | B.Sc. | 2018 | 1st | Gold (ST Category) | Gondwana University, Gadchiroli |
| 18. | Ku. Ashwini Bhaskar Gotefode | M.Sc. (Geology) | 2018 | 1st | | Gondwana University, Gadchiroli |
| 19. | Gurunanak Kawaduji Shivarkar | Indradhanushya | 2018 | | Gold | Late Gangabai Shankarrao Joshi Memorial Gold Medal Award Gondwana University, Gadchiroli |
| 20. | Rakshanda Samarth | M.Sc. (Geology) | 2019 | 1st | | Gondwana University, Gadchiroli |
| 21. | Bhagyashri N. Lanjewar | B.Sc. (Botany) | 2020 | 1st | Gold | Late Shankarlalji Bhutda Memorial Gold Medal Award Gondwana University, Gadchiroli |
| 22. | Monali G. Neware | M.Sc. (Geology) | 2020 | 1st | | Gondwana University, Gadchiroli |
| 23. | Rajat Y. Kawale | M.Sc. (Geology) | 2020 | 2nd | | Gondwana University, Gadchiroli |
| 24. | Riya K. Kapakar | M.Sc. (Geology) | 2020 | 3rd | | Gondwana University, Gadchiroli |
| 25. | Akshay R. Ksheersagar | B. A. | 2021 | 1st | Gold | Gondwana University, Gadchiroli |
| 26. | Ku. Namodita K. Sontakke | M.Sc. (Geology) | 2021 | 1st | | Gondwana University, Gadchiroli |
| 27. | Ku. Shital K. Pardhi | M.Sc. (Geology) | 2021 | 2nd | | Gondwana University, Gadchiroli |
| 28. | Ku. Priyanka K. Pardhi | M.Sc. (Geology) | 2021 | 3rd | | Gondwana University, Gadchiroli |

# SPORTS AND ACADEMIC ACHIEVEMENTS

Special merit shown in Sports / Athletics events at Inter collegiate Level and above (Inter collegiate, Ashwamedh, All India Inter University, National & Inter National Level) by the students of the college in the session of 2021-22

| Sr. No. | Name of Students | Class | National/ International/ University | Name of Game |
|---|---|---|---|---|
| 1. |  Shashikala Gangaram Aha | B.A.I | All India Inter University Savitribai Phule Pune University | Volleyball |
| 2. |  Bhushan Yashwant Somankar | B.A.I | All India Inter University Savitribai Phule Pune University | Hockey |
| 3. |  Shivani Wasudeo Boga | B.Sc. III | All India Inter University Jaipur (Rajasthan) | Handball |
| 4. |  Sujata Dattatray Myakalwar | B.Sc. III | All India Inter University Jaipur (Rajasthan) | Handball |
| 5. |  Harshita Ratishchandra Juare | B.Sc. III | All India Inter University Jaipur (Rajasthan) | Handball |
| 6. |  Laxmi Indrakumar Kodape | B.Sc. II | All India Inter University Jaipur (Rajasthan) | Mini Golf |
| 7. |  Chetan Anil Nandanwar | B.Sc. III | All India Inter University Jaipur (Rajasthan) | Basketball |
| 8. |  Aniket M. Bhurse | B.Sc. I | All India Inter University Jaipur (Rajasthan) | Mini Golf |

## SPORTS AND ACADEMIC ACHIEVEMENTS

Special merit shown in Sports / Athletics events at Inter collegiate Level and above (Inter collegiate, Ashwamedh, All India Inter University, National & Inter National Level) by the students of the college in the session of 2021-22

9. 

SET (Geology)

10. 

GATE (2021)

11. 

NET (Marathi)

12. 

SET Sociology (2020)

13. 

Aavishkar-2019 2nd Prize Winner

14. 

State and University level Best NSS Volunteer 2020-21

15. 

NET (Marathi) 2021

16. 

NET (Marathi) 2020

17. 

Aavishkar-2019 2nd Prize Winner

18. 

SET (Geology) 2021

## महाविद्यालयाचे विविध क्षेत्रांत कार्यरत भूषणावह विद्यार्थी

| | | |
|---|---|---|
| एस. एस. नैताम | : | गडचिरोली येथे जिल्हा खनिकर्म अधिकारी (D.A.M.O.) म्हणून निवड |
| डॉ.तन्मय राऊत | : | GSI जयपूर येथे भूगर्भशास्त्रज्ञ म्हणून निवड |
| डॉ. गुणवंत वडपल्लीवार | : | श्री. गोविंदराव मुनघाटे कला व विज्ञान महाविद्यालय कुरखेडा येथे सहायक प्राध्यापक म्हणून निवड |
| प्रा. डॉ. नंदू मने | : | गोंडवाना विद्यापीठातील इतिहास विभागात सहायक प्राध्यापक म्हणून निवड |
| श्री. योगेंद्र शेंडे | : | गडचिरोली येथे जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी म्हणून निवड |
| प्रा. प्रदीप चापले | : | वनश्री महाविद्यालय कोरची येथे सहायक प्राध्यापक म्हणून निवड |
| प्रा. आशिष सेलोकर | : | मोहसिनभाई झव्हेरी महाविद्यालय, वडसा येथे सहायक प्राध्यापक म्हणून निवड |
| श्री. प्रमोद बोरकर | : | असिस्टंट प्रोग्रामर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली |

# - अभ्यासक्रम -

## कला विद्याशाखा

### बी.ए. भाग १, २ व ३ करिता

दोन अनिवार्य व तीन ऐच्छिक असे एकूण ५ विषय विद्यार्थ्याने घ्यावयाचे आहेत.

**अनिवार्य विषय :** (१) इंग्रजी (२) मराठी

बी.ए. भाग – १ करिता ऐच्छिक विषयाचे तीन गट पाडलेले आहेत. त्यापैकी विद्यार्थ्यांना प्रत्येक गटामधून एक विषय निवडावयाचा आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **गट क्र. १ :** | (१) समाजशास्त्र | (२) राज्यशास्त्र | (३) गृहअर्थशास्त्र |
| **गट क्र. २ :** | (१) मराठी वाङ्मय | (२) इंग्रजी वाङ्मय | (३) संगीत |
| **गट क्र. ३ :** | (१) इतिहास | (२) अर्थशास्त्र | (३) भूगोल |

**टीप :** ✻ बी.ए.भाग १ मध्ये घेतलेले विषय भाग २ व ३ करिता कायम राहतील.

✻ भाग २ च्या विद्यार्थ्यांकरिता **Environmental Studies** हा विषय अनिवार्य राहील.

## विज्ञान विद्याशाखा

**अनिवार्य विषय :** (१) इंग्रजी (२) मराठी किंवा हिंदी

**खालील गटापैकी प्रत्येक विद्यार्थ्यांना एक गट निवडायचा आहे.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Mathematics | Chemistry | Physics |
| 2) | Mathematics | Computer Science | Physics |
| 3) | Chemistry | Botany | Zoology |
| 4) | Geology | Chemistry | Physics |
| 5) | Geology | Chemistry | Zoology |
| 6) | Microbiology | Chemistry | Zoology |
| 7) | Microbiology | Chemistry | Botany |

**टीप :** ✻ भाग २ च्या विद्यार्थ्यांकरिता **Environmental Studies** हा विषय अनिवार्य राहील.

✻ **B.Sc.I** चे विषयच **B.Sc.II** व **III** करिता घ्यावे लागतील.

## गृहविज्ञान विद्याशाखा

**B.Sc. Home Science**

**पात्रता** :– १२ वी पास

**माध्यम** :– मराठी

**संधी** :– फुड कंट्रोलर, फुड इंस्पेक्टर, शेफ, अन्न व औषधी विभागात विविध संधी

**वैशिष्ट्ये** :– पात्रताधारक शिक्षक, ग्रंथालयाची उत्तम सोय, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम, सुसज्ज प्रॅक्टिकल लॅब.

## वाणिज्य विद्याशाखा

**Bachelor of Commerce (B.Com.)**

**पात्रता** :– १२ वी पास

**माध्यम** :– मराठी

**संधी** :– सी.ए., सी.एस., बँकींग, एम.बी.ए., ICWA, एम.कॉम, यु.पी.एस.सी., एम.पी.एस.सी. इत्यादी.

**वैशिष्ट्ये** :– पात्रताधारक शिक्षक, सुसज्ज ग्रंथालय, रोजगाराभिमुख अभ्यासक्रम.

**टीप :** ✻ बी.कॉम. भाग १ मध्ये घेतलेले विषय भाग २ व ३ साठी कायम राहतील.
✻ भाग २ च्या विद्यार्थ्यांकरिता **Environmental Studies** हा विषय अनिवार्य राहील.

**- सूचना -**

महाराष्ट्र राज्यात शैक्षणिक संस्थामध्ये रॅगिंग घेण्यास मनाई आहे. याबाबत अधिनियम क्र. ३३ दि. १५ मे १९९९ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रकाशित करण्यात आलेले आहेत. या अधिनियमाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येईल. तरी विद्यार्थ्यांनी रॅगिंगपासून अलिप्त रहावे.

## पदव्युत्तर विभाग

### एम.ए.भाग - १ व २

१) मराठी
२) इतिहास
३) अर्थशास्त्र
४) समाजशास्त्र

### एम.एस्सी.भाग - १ व २

१) गणित (Mathematics)
२) रसायनशास्त्र (Chemistry)
३) भूगर्भशास्त्र (Geology)
४) प्राणिशास्त्र (Zoology)

### प्रवेश इच्छूक विद्यार्थ्यांना सूचना

१) प्रवेश केंद्रीय पद्धतीने होतील.

२) प्रवेश अर्जात एकापेक्षा अधिक विषय टाकण्याची सोय.

३) गुणवत्ता यादी लावण्यात येईल.

४) आरक्षणनिहाय जागा

५) प्रवेश शुल्क महाविद्यालयाने निश्चित केल्यानुसार

६) १० टक्के व्यवस्थापन मंडळाकरिता आरक्षित

७) प्रवेश करण्याची अंतिम तारीख सूचनेनुसार

**पदव्युत्तर विज्ञान विभाग प्रवेश समिती**

| | |
|---|---|
| १. प्रा. डॉ. चंद्रकांत डोर्लीकर | प्रमुख/समन्वयक |
| २. प्रा. डॉ. जयेश पापडकर | सहसमन्वयक |
| ३. प्रा. डॉ. सतीश कोला | सदस्य |

## आचार्य पदवी प्रवेश

### Ph.D. Admission

Institution of Higher Learning Research and Specialized Studies (IHLRSS) for Ph.D.

Subjects :

**1. Mathematics** **2. Zoology**
**3. Marathi** **4. Sociology** **5. History**

### Ph.D.करिता प्रवेश इच्छूक विद्यार्थ्यांना सूचना

१) PET परीक्षा उत्तीर्ण करणे अनिवार्य.

२) NET/SET असल्यास PET परीक्षेमधून सूट

३) महाविद्यालयात संबंधित IHLRSS मध्ये Procession Form भरणे. अर्जासोबत खालील कागदपत्रांची पूर्तता करावी.

✼ PET परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रिका ✼ NET/SET परीक्षा असल्यास त्याचे प्रमाणपत्र ✼ शैक्षणिक कागदपत्रे ✼ संशोधन आराखडा ✼ विद्यापीठाद्वारे प्राप्त मार्गदर्शकाचे पत्र ✼ जातीचे प्रमाणपत्र

४) SAC & RAC च्या बैठकीला सामारे जावे.

५) RAC ने मान्यता दिलेले अर्ज, संबंधित कागदपत्रे व संशोधन आराखडा विद्यापीठाकडे RRC च्या मान्यतेकरिता सुपूर्द करणे.

६) अर्ज करण्याचा कालावधी 16 of Direction No. 22/2019 नुसार डिसेंबर व जुलै आहे.

**आचार्य पदवीसंबंधित महाविद्यालयीन समिती**

| | |
|---|---|
| 1. Dr. L. H. Khalsa | - Director (RAC) |
| 2. Dr. C. P. Dorlikar | - Head (SAC) |
| 3. Dr. J. N. Papadkar | - Head, RAC (Zoology) |
| 4. Dr. C. D. Mungmode | - Member, SAC |
| 5. Dr. V. H. Raiwatkar | - Member, SAC and RAC (Marathi) |
| 6. Dr. G. M. Kadhav | - Head RAC (Sociology) |

## सत्र २०२१-२२ मधील प्रवेश क्षमता माहितीदर्शक तक्ता

| वर्ग | विद्यार्थी क्षमता | तुकडी संख्या | २०२१-२२ चे प्रवेशित विद्यार्थी |
|---|---|---|---|
| बी. ए. भाग -१ | ३२० | ३ | २४७ |
| बी. ए. भाग -२ | २२० | २ | २२३ |
| बी. ए. भाग -३ | २२० | २ | १८४ |
| बी. कॉम भाग - १ | १२० | १ | ५५ |
| बी. कॉम भाग - २ | १२० | १ | ४२ |
| बी. कॉम भाग - ३ | १२० | १ | ४६ |
| बी. एस्सी. भाग - १ | २२० | २ | १९३ |
| बी. एस्सी. भाग - २ | २२० | २ | १७९ |
| बी. एस्सी. भाग - ३ | २२० | २ | २१३ |
| बी. एस्सी. गृहविज्ञान भाग - १ | १२० | १ | २५ |
| बी. एस्सी. गृहविज्ञान भाग - २ | १२० | १ | ०३ |
| बी. एस्सी. गृहविज्ञान भाग - ३ | १२० | १ | ०२ |
| एम. एस्सी भाग - १/२ (गणित) | २२/२२ | १ | २३/२६ |
| एम. एस्सी भाग - १/२ (रसायनशास्त्र) | २०/२० | १ | २४/२५ |
| एम. एस्सी भाग - १/२ (भूगर्भशास्त्र) | २०/२० | १ | २३/२२ |
| एम. एस्सी भाग - १/२ (प्राणीशास्त्र) | २०/२० | १ | २४/२८ |
| एम. ए. भाग-१/२ (इतिहास) | ८०/८० | १ | १५/१९ |
| एम. ए. भाग-१/२ (अर्थशास्त्र) | ८०/८० | १ | ०८/०४ |
| एम. ए. भाग-१/२ (मराठी) | ६०/६० | १ | ३१/२० |
| एम. ए. भाग-१/२ (समाजशास्त्र) | ८०/८० | १ | ३८/१८ |
| कम्युनिटी कॉलेज (डिप्लोमा इन ड्रेस डिझाईनिंग) | ५० | १ | ४७/१४ |
| पीएच. डी. सेंटर (गणित,प्राणिशास्त्र, मराठी,इतिहास,समाजशास्त्र) | - | - | १९ |

**१. आरक्षित टक्केवारी**

१) अनुसूचित जाती १३%
२) अनुसूचित जमाती ७%
३) विमुक्त जाती (अ) ३%
४) भटक्या जाती (ब) २.५%
५) भटक्या जमाती (क)३.५%
६) भटक्या जमाती (ड) २%
७) इतर मागासवर्गीय १९%
८) विशेष मागासवर्गीय २% (मागास प्रवर्गातून जागा शिल्लक राहिल्यास)
९) महिला आरक्षण ३०%
१०) अपंग ३%
११) माजी सैनिक/स्वातंत्र्य सैनिक ५%
१२) दुर्बल घटक १०%
१३) शहिद पोलीस अधिकारी/कर्मचारी पाल्य मोफत सवलती

**सन २०२१ – २२ मध्ये प्रवर्गनिहाय विद्यार्थ्यांचा खालील टक्केवारीवर प्रवेश बंद झाला.**

| Category | B.A. I | B.Com. I | (A) B.Sc. I | (B) | B.Sc. I (Home Sci.) |
|---|---|---|---|---|---|
| SC | 53.17% | - | 47.54% | 55.05% | 50.46% |
| ST | 43.23% | 54.67% | 47.85% | 56.31% | 46.31% |
| NT/ VJ | 47.69% | 49.85% | 50.92% | 46.92% | 42.5% |
| OBC | 42.92 % | 42.00% | 42.62% | 46.46% | 43.38% |
| SBC | 42.92 % | 49.67% | 54.00% | 63.05% | 52.15% |
| OPEN | 54.33 % | 54.00% | 50.15% | 48.31% | 72.83% |

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व इतर कलागुणांना प्रोत्साहन देण्याकरिता महाविद्यालयात कार्यरत विविध विभाग / समित्या

1) Staff Council
2) Program Head
3) IQAC
4) Academic Activities Planning and Monitoring Committee
5) Cultural Dept.
6) National Service Scheme. (N.S.S.)
7) Women Empowerment Committee
8) Environmental Study Center
9) Infrastructure Maintenance Committee
10) Wellwisher's Committee
11) Employment and Guidance Bureau.
12) Knowledge and Resource Committee
13) Adult and Continuing Education
14) Population Education Club
15) Press, Media and Publicity
16) Research and Development Committee
17) Website Development Committee
18) Student Welfare & Discipline Committee
19) Health Center
20) College Development Committee
21) Games & Sports Department
22) Students Grievance Committee
23) Grievance Redressal Cell
24) Mahatma Gandhi Study & Research Center
25) Dr. Babasaheb Ambedkar Study & Research Center
26) Staff Welfare & Development Committee
27) Admission Committee
28) College Magazine Committee
29) Prospectus Committee
30) Drafting Committee

(अनुदानित / विना अनुदानित / कायम विना अनुदानित करिता) व शिष्यवृत्ती/फ्रिशिप सवलत धारक विद्यार्थ्यांना भरावयाचे शुल्क

| Sr.No. | Fee Details | BA/ B.Com-I | B.Sc./B.Sc.(Home Sci.) MA/M.Sc.-All I Year | BA/B.Com/B.Sc./B.Sc.(Home Sci.)-II & III Year MA/M.Sc.-All II Year |
|---|---|---|---|---|
| 1. | Identity Card | 25 | 25 | 25 |
| 2. | Caution Money | 30 | 30 | - |
| 3. | Student's Insurance | 10 | 10 | 10 |
| 4. | College Test Exam Fee | 40 | 40 | 40 |
| 5. | Cycle Stand | 20 | 20 | 20 |
| 6. | College E-Suvidha | 50 | 100 | 100 |
| | **Total :** | **175** | **225** | **195** |

## विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत

**'कम्युॅनिटी कॉलेज' (डिप्लोमा अॅन्ड अॅडव्हांस डिप्लोमा कोर्स इन ड्रेस डिझायनिंग)**

- युवा युवतींना आत्मनिर्भर व स्वावलंबी करणारा व्यावसायिक अभ्यासक्रम
- कापड उद्योगातील तांत्रिक ज्ञान, व्यवस्थापन व व्यावसायिक प्रतिभेला चालना देणारा ड्रेस डिझायनिंग कोर्स
- गडचिरोलीसारख्या मागास व ग्रामीण भागात ड्रेस डिझायनिंगमध्ये डिप्लोमा व एडव्हांस डिप्लोमा शिकविणारे एकमेव महाविद्यालय.
- तज्ज्ञ प्राध्यापकांचे मार्गदर्शन व प्रात्यक्षिकावर भर
- व्यावसायिक कौशल्य, वृद्धिंगत करण्यासाठी कार्यशाळांचे आयोजन. पात्रता १२ वी उत्तीर्ण (कला, विज्ञान, वाणिज्य इ.)



# ... ज्ञान स्त्रोत केंद्र ...

